दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य सपादक सागर राणा अभोरे    सपादक बडूभाऊ इगोले

RNI No - MHMUL/25/A0788

वाशीम ■ सोमवार दि. 17 ऑक्टोबर 2025 ■ वर्ष : 2 ले ■ अंक : 195 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL039353


## पाकिस्तानात जाफर एक्सप्रेस पुन्हा टार्गेटवर

### बॉम्बस्फोटाने रेल्वे ट्रॅक उद्ध्वस्त, अनर्थ टळला

**कराची -** पाकिस्तानच्या बलूचिस्तानमध्ये पुन्हा एकदा जाफर एक्सप्रेस ट्रेनला टार्गेट केले आहे. बलूचिस्तानच्या नसीराबाद जिल्ह्यात रेल्वे ट्रॅकवर लावलेल्या स्फोटकामुळे ट्रेन येण्यापूर्वीच मोठा स्फोट झाला. ज्यामुळे जाफर एक्सप्रेस आणखी एका मोठ्या अपघातातून थोडक्यात बचावली.



पाकिस्तानातील जाफर एक्सप्रेसवर याआधीही बऱ्याचदा हल्ले झाले आहेत. पोलीस आणि रेल्वे पोलिसांच्या माहितीनुसार, अज्ञात हल्लेखोरांनी शहीद अब्दुल अजीज बुल्लो परिसरात रेल्वे ट्रॅकवर बॉम्ब लावला होता. क्वेटाहून पेशावरसाठी जाणाऱ्या या ट्रेनच्या तिथून रवाना होण्यापूर्वी हा स्फोट घडला. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. या हल्ल्यात कुणीही प्रवासी अथवा रेल्वे कर्मचारी जखमी झाला नाही. स्फोटानंतर तातडीने या भागात सुरक्षा जवान पोहचले आणि त्यांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला. हा हल्ला कुणी केला आणि अज्ञात हल्लेखोर कुठे पसार झाले याचा तपास यंत्रणा शोध घेत आहे. इतकेच नाही तर रेल्वे ट्रॅकवर स्फोटाशिवाय शस्त्रांनी सज्ज ४ रॉकेट ट्रेनवर डागण्यात आले. मात्र चारही रॉकेटपैकी एकही ट्रेनच्या कोचला धडकले नाही. स्फोटामुळे रेल्वे ट्रॅक उद्ध्वस्त झाला. ज्यामुळे क्वेटा आणि देशातील इतर भागात जाणारी रेल्वे वाहतूक अनिश्चित काळासाठी रोखण्यात आली. सुरक्षेच्या कारणास्तव ४ दिवसांच्या अंतराने ही सेवा रविवारी पुन्हा सुरू झाली होती. बलूच राष्ट्रवादी नेते मीर यार बलूच यांनी बलूच रिपब्लिकन गार्ड्सने या हल्ल्याची जबाबदारी घेतल्याचं सांगण्यात आले आहे.

दरम्यान, जाफर एक्सप्रेस सातत्याने या वर्षभरात बंडखोरांच्या हल्ल्याचा सामना करत आहेत. या हल्ल्याची सुरुवात ११ मार्च रोजी झाली होती. जेव्हा बलूचिस्तान लिबरेशन आर्मीच्या बंडखोरांनी जवळपास ४४० प्रवासी घेऊन जाणाऱ्या ट्रेनवर हल्ला केला होता. तेव्हापासून ही ट्रेन वारंवार टार्गेट होत आहे. जून ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबरमध्येही या ट्रेनला टार्गेट करून अनेकदा बॉम्बस्फोट आणि रॉकेट हल्ले घडवून आणले आहेत. ज्यात प्रवासी जखमी झालेत, ट्रेनचे डबे पटरीवरून घसरले आहेत.

## दिल्ली ब्लास्ट : रोहतकची डॉक्टर प्रियंका शर्मा अनंतनागमधून ताब्यात

### कुटुंबीयांनी काय सांगितंल?

लाल किल्ला कार ब्लास्ट आणि फरीदाबाद टेरर मॉड्यूल प्रकरणात राष्ट्रीय तपास यंत्रणा (NIA) आणि जम्मू-काश्मीर पुलिसांच्या काउंटर-इंटेलिजन्स टीम्सचा तपास सुरू असतानाच, जम्मू-कश्मीरच्या अनंतनागमधून रोहतकच्या डॉक्टर प्रियांका शर्माला आदिलशी संबंधित चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. यानंतर, आता प्रियांकाच्या कुटुंबीयांची प्रतिक्रिया आली आहे.

यासंदर्भात बोलताना प्रियांकाचा भाऊ भारत यांनी स्पष्ट केले आहे की, 'आपला आणि प्रियांकाचा आदिलशी दूरान्वयानेही काही संबंध नाही, रात्री सुमारे नऊ वाजता प्रियांकाशी शेवटची बोलणे झाले होती आणि त्यानंतर संपर्क होऊ शकला नाही. तिच्या रूममेटसोबत बोलणे झाल्यानंतर समजले की, तपास यंत्रणांनी तिला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.' भारत पुढे म्हणाले, 'प्रियांका जम्मू-कश्मीरमध्ये पीएचडी करत असून महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहते. चौकशीनंतर तिचा मोबाइल फोनही जप्त करण्यात आला आहे. आम्ही तपासात पूर्ण सहकार्य करू. आदिल तिचा एमडी कोर्सचा सीनियर असल्याने बोलणे झालेले असू शकते. प्रियांका झज्जरच्या डीघलमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहे. ती मेडिसीनमध्ये एमडी करण्यासाठी जम्मू काश्मीरला गेली आहे. तिचे रोज घरच्यांसोबत व्हिडिओकॉल वरून बोलणे होत असते. दहशतवादी आदील अथवा अशा कोणत्याही नेटवर्कशी आपला संबंध नाही. दरम्यान, जम्मू-कश्मीर पोलिसांच्या काउंटर-इंटेलिजन्स टीमने अनंतनागच्या मलकनाग भागातील एका भाड्याच्या फ्लॅटवर छापा टाकून प्रियंका शर्माला ताब्यात घेतले. जप्त केलेला मोबाइल फोन आणि सिम कार्डची फॉरेन्सिक तपासणी सुरू आहे.




जीएमसीचा माजी कर्मचारी डॉक्टर आदिलच्या अटकेनंतर मिळालेल्या माहितीनुसार, या नेटवर्कला लॉजिस्टिक किंवा आर्थिक मदत करणाऱ्यांचा शोध सुरू असून कॉल-डिटेल रेकॉर्डच्या आधारे प्रियांकाचा पत्ता मिळाला. फरीदाबाद मॉड्यूल आणि लाल किल्ला ब्लास्ट प्रकरणात आदिलला उत्तर प्रदेशातील सहारनपूरमधून अटक करण्यात आली आहे.

## कुंभमेळ्यासाठी जळगाव विमानतळाचा विस्तार

### २५०० मीटरपर्यंतच्या धावपट्टीसाठी ३० कोटी



**जळगाव :** नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी जळगाव विमानतळाचा विस्तार करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी विमानतळ परिसराची पाहणी करून सुरक्षा, पायाभूत सुविधा आणि प्रवासी सुविधा यांचा आढावा घेतला. त्यांनी विमानतळ संचालक हर्ष त्रिपाठी यांच्यासोबत विस्तारीकरणाच्या विविध बाबींवर सविस्तर चर्चा केली.

विमानतळ संचालक त्रिपाठी यांनी महापालिकेकडून पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याची, बाहेरील रस्त्यांवरील अपुरा प्रकाश आणि विजेचे खांब दुरुस्त करण्याची तसेच धावपट्टी विस्ताराची गरज अधोरेखित केली. दरम्यान, कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी घुगे यांनी विविध विभागप्रमुखांची बैठक घेतली. या बैठकीत रेल्वे वाहतूक व्यवस्था, महामार्ग स्थिती, नाशिकसाठी वाहतुकीचे नियोजन आणि विमानतळ सुविधांचा विस्तार याबाबत चर्चा झाली.

> जळगाव विमानतळ हे उत्तर महाराष्ट्राच्या विकासाचे केंद्र आहे. प्रवासी सेवा सुलभ, सुरक्षित आणि विस्तारक्षम ठेवण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे.
>
> - **रोहन घुगे**, जिल्हाधिकारी

विमानतळ टर्मिनल विस्तारीकरणासाठी ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून दोन मोठी व एक लहान विमानांची व्यवस्था होणार आहे. सध्या १,७५० मीटर धावपट्टी असून ती २,५०० मीटरपर्यंत वाढवण्याची गरज असल्याचे सांगण्यात आले.

जळगावहून सध्या पुणे, मुंबई, हैदराबाद, अहमदाबाद आणि गोवा या शहरांसाठी विमानसेवा सुरू आहे. इंडिगो कंपनीने सेवा सुरू केल्यास दिल्ली, सूरत, इंदूर आणि नागपूरसारख्या प्रमुख शहरांनाही थेट जोडणी मिळू शकेल, अशी अपेक्षा आहे.

## कुंभमेळ्यापर्यंत २५ हजार कोटींची कामे पूर्णत्वास

### मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा; निधीसाठी केंद्र आणि राज्य सरकार कटिबद्ध

**नाशिक :** नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू नये, यासाठी केंद्र व राज्य सरकार दोन्ही कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. सध्या सुमारे ६ हजार कोटी रुपयांच्या कामांचा शुभारंभ झाला असून कुंभमेळा सुरू होईपर्यंत एकूण २५ हजार कोटी रुपयांची कामे पूर्णत्वास जातील, अशी घोषणा त्यांनी केली. नाशिक येथे कुंभमेळा कामांच्या शुभारंभ सोहळ्यानंतर आयोजित सभेत ते बोलत होते.

या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, मंत्री माणिकराव कोकाटे, दादाजी भुसे, खासदार राजाभाऊ वाजे, डॉ. शोभा बच्छाव, आमदार राहुल आहेर, राहुल ढिकले, देवयानी फरांदे, सीमा हिरे, दिलीप बनकर, किशोर दराडे, तसेच प्रमुख अधिकारी आणि महायुती पदाधिकारी उपस्थित होते.

नाशिकमध्ये २० हजार कोटींची कामे हाती घेतली असून ती २५ हजार कोटींपर्यंत वाढतील. आधीच ६ हजार कोटींची कामे सुरू झाली आहेत. सर्व प्रशासकीय अधिकारी समन्वयाने काम करत आहेत. काही नागरिकांना विस्थापित व्हावे लागते, तरीही त्यांनी सहकार्य दाखवले आहे.

गोदावरी स्वच्छ ठेवणे आणि पुढील २५ वर्षांचा विकास लक्षात घेऊन नियोजन करणे, हेच आमचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मोठ्या संख्येने भाविक येणार असल्याने सुरक्षेची मोठी जबाबदारी आहे. त्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून निगराणी ठेवली जाणार आहे. दर्जेदार सुविधा निर्माण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. उत्तम नियोजन आणि अंमलबजावणीद्वारे हा कुंभ यशस्वीपणे पार पडेल, अशी आशा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली.



#### ७५ वर्षांनंतरचा विशेष कुंभ

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यंदाचा कुंभमेळा ७५ वर्षांनंतर येणाऱ्या त्रिखंड योगात होत असल्याने अत्यंत विशेष आहे. सुमारे २८ महिने चालणारा हा कुंभ असेल. प्रयागराजनंतर जगातील सर्वात मोठा आस्थेचा सोहळा नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे भरतो आहे. मागील कुंभ यशस्वी झाला होता; मात्र यावेळी पाच पट अधिक भाविक येणार आहेत. त्यांच्या सुरक्षेची आणि सुविधांची व्यवस्था ही मोठी जबाबदारी आहे.

#### नाशिक जगाच्या नकाशावर झळकेल

सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे नाशिकचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलेल. हा सोहळा नाशिकला जगाच्या नकाशावर स्थान मिळवून देईल. प्रशासनाने तयारी चोख केली असून हा कुंभ आधुनिक, नियोजनबद्ध आणि सुरक्षित राहील असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले.

> नाशिक आणि त्र्यंबकेश्वरचा कुंभ जागतिक दर्जाचा असावा, या हेतूने शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. नागरिक, अधिकारी आणि प्रशासन यांच्या सहभागातून हा सोहळा ऐतिहासिक ठरेल.
>
> - **गिरीश महाजन**, कुंभमेळा मंत्री

## पेणमध्ये ४ वर्षांची चिमुकली बेपत्ता



**पेण :** रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील हेटवणे वाडी येथील केवळ ४ वर्षांची चिमुकली किशोरी किरण महालकर ही बुधवारी सकाळपासून बेपत्ता झाली असून २४ तास उलटूनही तिचा थांगपत्ता लागलेला नाही. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून पोलीस आणि ग्रामस्थांकडून मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम राबवली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी किशोरी ही आईसोबत गावाबाहेर नाल्याजवळ शौचास गेली होती. आई शौचालयाला असताना तिने मुलीला बाजूला उभे करून ठेवले. त्या वेळी मुलगी 'आई, कुठे आहेस तू?' असे विचारत होती. आईने 'बाळा, आलेच मी' असे उत्तर दिल्यानंतर फक्त काही मिनिटांतच चिमुकली गायब झाली. आईने मुलीचा शोध घेत आरडाओरडा केला, मात्र कुठेच काहीच सुगावा लागला नाही. काही तासांच्या प्रयत्नांनंतर गावकऱ्यांनी पोलिसांना माहिती दिली. पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली, मात्र मुलगी सापडली नाही.

गावाला लागून घनदाट जंगल असल्याने शोधमोहीम जंगलातही राबवण्यात आली. यावेळी गावकऱ्यांना किशोरीची चप्पल आणि कपडे जंगलात सापडले, मात्र ती स्वतः कुठेच दिसली नाही. त्यामुळे घटनेने वेगळे वळण घेतले आहे.

#### २०० जणांचा शोधमोहिमेत सहभाग

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या सूचनेनुसार शोधमोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. सीआरपीएफ, क्यूआरटी, श्वान पथक आणि खोपोली बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले असून सुमारे २०० लोक या शोधकार्यात सहभागी आहेत. पोलीस प्रशासन सर्व शक्यता तपासत असून तपासाचा वेग वाढवण्यात आला आहे.

## खुनाचा बदला घेण्यासाठी आलेली टोळी जेरबंद

### गावठी पिस्तुल, कोयता जप्त



**सांगली :** मिरज शहरात वर्चस्ववादातून अडीच महिन्यांपूर्वी झालेल्या निखिल कलगुटगी हत्येचा बदला घेण्यासाठी आलेल्या पाच जणांच्या टोळीला महात्मा गांधी चौक पोलिसांनी अटक केली. या टोळीकडून गावठी पिस्तुल, तीन जिवंत काडतुसे आणि लोखंडी कोयता असा घातक शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्यांची नावे वंश दिनकर वाली (२०), समर्थ संजय गायकवाड, वैभव राजाराम आवळे (२८), आकाश जगन्नाथ फोंडे (२१) आणि सौरभ प्रसाद पोतदार (२३) अशी आहेत.

१२ नोव्हेंबर रोजी निखिल कलगुटगी खूनप्रकरणातील आरोपी सलीम पठाण, चेतन कलगुटगी, सोहेल तांबोळी आणि विशाल शिरोळे यांना वैद्यकीय तपासणीसाठी मिरज सिव्हिल हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले होते. त्यावेळी पोलिसांना वंश वाली हा हॉस्पिटल परिसरात संशयास्पद हालचाली करताना दिसला. पोहेकॉ राजेश गवळी यांनी तत्काळ पथकाला माहिती दिली. तपासात त्याच्याकडे लाल कापडात गुंडाळलेले लोडेड गावठी पिस्तुल आणि कंबरेला लावलेला लोखंडी कोयता आढळला. चौकशीत त्याने व आपल्या साथीदारांनी अटकेत असलेल्या आरोपींवर हल्ला करण्यासाठी आले असल्याची कबुली दिली. पोलिसांनी तत्काळ इतर साथीदारांचा शोध घेतला आणि काही तासांत त्यांनाही पकडले.

## अवैध रेती उत्खननावर कारवाई

**नांदेड :** नांदेड तहसील प्रशासनाने अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई केली आहे. या मोहिमेत चार इंजिन जिलेटीनने उडवून नष्ट करण्यात आली, तर वीस तराफ्यांना जाळण्यात आले. एकूण २४ लाख रुपयांचा मुद्देमाल जागेवरच नष्ट करण्यात आला. ही कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डीले आणि उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार संजय वारकड यांच्या नेतृत्वात पार पडली. नायब तहसीलदार संजय नागमवाड, मंडळ अधिकारी मोहसीन सय्यद, तसेच महसूल विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

## सहस्त्रकुंड धबधब्यात अडकलेले सात जण सुखरूप

**नांदेड :** किनवट तालुक्यातील प्रसिद्ध सहस्त्रकुंड धबधब्यात पाण्याच्या प्रवाहात अडकलेल्या सात जणांचा थरारक बचाव करण्यात प्रशासनाला यश आले. उमरखेड तालुक्यातील एकांबा येथील चार महिला आणि तीन मुले पाण्यात अडकल्यानंतर दोन तासांच्या प्रयत्नांनंतर सर्वांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.

ही घटना दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. धबधब्याचा प्रवाह कमी असल्याचे समजून महिलांसह मुले पाण्यात उतरली; मात्र अचानक वाढलेल्या प्रवाहामुळे त्या पाण्यात अडकल्या. जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर आणि उपविभागीय अधिकारी जेनिथ दोन्तुला यांच्या मार्गदर्शनाखाली शोध व बचाव कार्य सुरू करण्यात आले. तहसीलदार शारदा चोंडेकर, स.पोनि. उमेश भोसले यांच्या नेतृत्वाखाली महसूल व पोलीस यंत्रणा आणि स्थानिक युवकांनी समन्वय साधून बचाव कार्य पार पाडले. भोई समाजातील पांडुरंग नागीलवाड, दत्ता चोपलवाड, अनिल भट्टेवार, रामराव घट्टलवार, दत्ता विठ्ठलवार, सुनिल भट्टेवार आदींनी धाडसीपणे पाण्यात उतरून सातही जणांना वाचवले.

बचाव करण्यात आलेल्यांमध्ये अनुसयाबाई ताळमवार (४५), गजराबाई काठेवाड (४५), सुवर्णा गांधरवाड (३२), पूजा ताळमवार (१९), कोमल काठेवाड (१७), कामिनी गांधरवाड (४) आणि विघ्नेश गांधरवाड (१) यांचा समावेश आहे. सर्वजण सुखरूप असून वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना सुरक्षित स्थळी नेण्यात आले आहे.

## संपादकीय

### युती म्हणून लढायचे की जानी दुश्मन म्हणून...?

लोकसभा निवडणुकीत मोदीजींचे हात बळकट करायचे म्हणून आम्ही झोकून देऊन काम केले. विधानसभेला फक्त देवाभाऊंसाठी मनाला मुरड घातली. पार्थचे प्रकरण बाहेर येताच आमच्या सौ.ने आम्हाला खूप झापले. तिला भाजपला मतदान करायचे होते. पण भाजपचा उमेदवार नसल्यामुळे तिला दादांच्या उमेदवाराला मतदान करावे लागले होते. त्याचा राग मनात धरून तिने आम्हाला आज चहा पण दिला नाही. सौ. च्या माहेरी दादांना मतदान करायचे होते. मात्र, तिथे त्यांचाही उमेदवार नसल्यामुळे त्यांनी म्हणे नाईलाजाने कमळाचे बटन दाबले... तर पोराच्या सासुरवाडीत शिंदेसेनेच्या उमेदवाराला मतदान करायचे होते, पण तिथे त्यांचा उमेदवार नव्हता म्हणून त्यांनी इच्छा नसताना दुसऱ्याला मतदान केले... आमच्या घरचे सोडून द्या... प्रत्येक घरात अशी उभी फूट पडली आहे.

एकाच घरात भाजप, शिंदेसेना आणि काँग्रेसचा कार्यकर्ता एका छताखाली राहतो. घराबाहेर पडले की एकमेकांच्या विरोधात घोषणा देतो. शिवसेना, राष्ट्रवादीची दोन घरांची चार घरं झाली. मात्र, गावागावात एकाच घराची सहा सहा घरं झाली आहेत... "कुठे नेऊन ठेवला गाव माझा" असे तुम्हाला विरोधक म्हणतील. मात्र तुम्ही त्याकडे लक्ष देऊ नका. विरोधक नुसते बोलतात. प्रत्यक्षात काहीच करत नाहीत, हे सगळ्या महाराष्ट्राला कळाले आहे. पार्थचे प्रकरण बाहेर आल्यावर विरोधकांनी जोरदार पत्रकार परिषदा घेतल्या. आरोप करून शांत बसले. ते दुसरे काहीही करू शकत नाहीत.

तुम्ही विरोधात असता तर आतापर्यंत महाराष्ट्रातील प्रत्येक गाव पिंजून काढले असते. पार्थ, दादा यांच्या विरोधातले गाडीभर पुरावे लोकांना दाखवले असते... जलसिंचनातल्या ७० हजार कोटीच्या घोटाळ्यातले गाडीभर पुरावे दाखवले होते अगदी तसे... महागाई वाढली म्हणून सिलिंडर डोक्यावर घेऊन आंदोलन केले होते, तसे आंदोलन फक्त तुम्हीच करू जाणे... विद्यमान काँग्रेस आणि शरद पवारांची राष्ट्रवादी यांनी अशी आंदोलने करणे सोडून दिले आहे. त्या बदल्यात तुम्ही त्यांच्या दोन-चार फायली क्लीअर करून द्या. आता पार्थचेच बघा ना. "तो असे काही करू शकेल असे मला वाटत नाही" अशी पहिली क्लीनचिट सुप्रिया सुळे यांनी दिली. इतका प्रभावी विरोधक असल्यावर तुम्हाला चिंता करायची गरज नाही...

आता निवडणुकीत कार्यकर्ते तुम्हाला आग्रह करतील. लोकसभा, विधानसभेला तुमच्यासाठी कष्ट केल्याच्या कहाण्या सांगतील... तुम्हालाच तिकीट देतो, असे तुम्ही आश्वासन दिल्याची आठवण करून देतील... आम्ही किती वेळा तुमच्या दिवाळीला आकाश दिवे करायचे, असेही विचारतील... असे म्हणणाऱ्या प्रत्येकाला लोकसभा, विधानसभेत दिलेल्या गांधीजींच्या फोटोंचा हिशोब मागा... किती फोटो कुठे लावले? उरलेले फोटो कोणत्या कपाटात ठेवले, याचा जाब विचारा... मग बघा, सगळे कसे गप्पगार बसतील. तुम्ही ज्याला तिकीट द्याल त्याचे काम करू, असेही सांगतील... फार फार तर आणखी थोडे गांधीजींचे फोटो मागतील... जास्ती फोटो मागणाऱ्यांना शिंदेसेनेकडे पाठवा... ते दिलदार आहेत...

जे कार्यकर्ते आपल्या निवडणुकांमध्ये सतरंज्या उचलायचे, त्यांना त्यांचे काम करू द्या. ते त्यात तरबेज झाले आहेत. झेडपी, पालिका, महापालिकेच्या निवडणुकीत अन्य पक्षातील हिस्ट्रीशीटर शोधा. महिलांसाठी वॉर्ड आरक्षित असेल तर अन्य पक्षातील नेत्यांची बहीण, बायको उत्सुक असेल तर त्यांना तिकीट द्या. आपल्या पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते सतरंज्या टाकायला तयारच असतील.. सोलापुरात आपण आपल्याच पक्षातील नेत्याच्या विरोधकांना पक्षात घेऊन टाकले. त्यामुळे तिथे विरोधकच शिल्लक नाही. कोणाला तिकीट द्यावे, यासाठी आपल्याच पक्षात जो "टोकाचा सुसंवाद" सुरू आहे, तोच पॅटर्न सगळीकडे राबवायला हरकत नाही. आपल्याला आपला पक्ष मोठ्ठा करायचा आहे... तेव्हा आजपर्यंतची दोस्ती विसरा. एकमेकांच्या विरोधात जानी दुश्मनासारखे उभे राहा. निवडून आल्यानंतर आपण पुन्हा एकत्र येऊ... सगळेच विरोधक, सगळेच सत्ताधारी या न्यायाने आपण सगळ्यांना सत्तेचा थोडा थोडा लाभ देऊ, एवढाच संदेश महाराष्ट्रभर द्या. मग बघा काय होते ते...

# आदिवासी विकास महामंडळाच्या संचालक निवडणुकीत सुनील भुसारा विजयी.

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : दयानंद शिंदे**

**मोखाडा :** महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या संचालक मंडळ निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार सुनील चंद्रकांत भुसारा हे ठाणे पालघर मतदारसंघातून 108 पैकी 95 मते मिळवत या निवडणुकीत सर्वाधिक मतांनी विजयी झाले आहेत तर त्यांच्या खालोखाल ९० मते मिळवत दिलीप पटेकर त्यांनीही विजय मिळवला आहे. तर जिजाऊ पुरस्कृत आणि भाजप पॅनल मध्ये सामील असलेले चिंतामण विलात यांना १६ तर विनोद शिंदा यांना केवळ ४ मते मिळाली.भुसारा हे मागील १५ वर्षांपासून या महामंडळात



संचालक होते मात्र ही निवडणुकीत विरोधकांनी अतिशय प्रतिष्ठेची केली होती मात्र सहकार क्षेत्रातील त्यांचा दांडगा जनसंपर्क असल्याने १०८पैकी तब्बल ९५मते मिळवत भुसारा यांनी विरोधकांना मात दिली आहे.

" खरतर पक्ष विरहीत ही निवडणूक मी लढवली यामध्ये मी आणि राज्यातून सुद्धा अनेक ज्येष्ठ संचालक निवडून आले. सर्वप्रथम माझ्या मतदार बांधवांचे आभार मानतो तसेच प्रत्येक शेतकरी बांधव हा आमच्या महामंडळाचा कणा असून त्याच्या हितासाठी आता अधिक जोमाने काम करणार आहे.

**सुनील भुसारा**
**संचालक, आदिवासी विकास महामंडळ.**

महाराष्ट राज्य आदिवासी विकास महामंडळाच्या संचालक पदासाठीची ही निवडणूक होती. ठाणे आणि पालघर जिल्हयातून २ संचालक निवडायचे होते. यासाठी चार उमेदवार रिंगणात होते. यामधून भाजपाकडून पॅनल बनविण्यात आला होता. तर भुसारा यांनी एकट्याने ही निवडणूक लढवत आपला विजय संपादन केल्याने त्यांचे अभिनंदन होत आहे मात्र दोन्ही जिल्ह्यातील या मतदारांपर्यंत जाऊन आपले सहकार क्षेत्रातील वर्चस्व देखील त्यांनी दाखवून दिले. या निवडीबाबत त्यांचे खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार यांनी ट्विट करत अभिनंदन केले तर दोन्ही जिल्ह्यातून त्यांचे अभिनंदन होत आहे भुसारा यांना महामंडळातील कामांचा चांगला अनुभव असल्याने शेतकरी बांधवांनी देखील आभार मानले आहेत.

### काजळेश्वर परीसरात कापूस पीकात वण्य प्राण्यांचा हैदोस . पीकाचे नुकसान . शेतकरी वैतागले .

#### वण्य प्राण्यांचा वणविभागाने बंदोबस्त करावा व नुकसान भरपाई द्यावी शेतक-र्यांची मागणी .

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा:** कारंजा तालुक्यातील काजळेश्वर तथा परीसरातील जानोरी ;उकर्डा; पानगव्हान; विराहीत; उजळेश्वर पारवा पलाना शेतशिवारातील प-हाटी कपाशीचे पीक शेतीत डुकरे रोही माकडे इत्यादी वण्य प्राण्यांनी हैदोस मांडला असून पीकाचे मोठ्या प्रमाणाचे नुकसान होत आहे . वण विभागाने वण्य प्राण्यांचा बंदोबस्त करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी पीडीत त्रस्त शेतकऱ्यांकडून होत आहे . वृत्त असे की यावर्षी काजळेश्वर तथा लगतच्या शेतशिवार परीसरात कपाशीची शेतकऱ्यांनी लागवड मोठ्या प्रमाणात केली . पेरणीनंतर कोवळ्या पीकाला वाणी प्रजातीने रोपावर हल्ला चढऊन शेतीतील पऱ्हाटीचे पीक फस्त केल . अनेकांनी हिंमतीने दुबार पेरणी करून पीक जगविले . पीक बहरण्यापासून जंगली वण्य प्राण्यांचा हैदोस सुरु झाला . रात्रभर शेतात जागल करुणही संधी साधून डुकरे रोही माकडे पीकाचे नुकसान करीत आहेत . यामुळे शेतकरी वैतागला असून निराश झाला आहे . वण विभागाने वण्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा व शेती पीकाचे नुकासान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी करीत आहे .

काजळेश्वर शिवारात माझे पांच एकर क्षेत्रात कपाशी पीक असून डुकराने काल माझ्या शेतात हैदोस केला असून चाळीस टक्के पिकाची नासाडी केली आहे . वण विभागाने पहानी करून मला नुकसान भरपाई द्यावी व वण्य प्राण्याचा बंदोबस्त करावा .

**नामदेव विष्णू तिडके**
**शेतकरी काजळेश्वर**



# लाल किल्ला स्फोटाची जबाबदारी टीआरएफने स्वीकारली

## 'पहलगाम' हल्ल्याशी जोडले स्फोटाचे धागेदोरे

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या भीषण बॉम्बस्फोटाच्या तपासात अत्यंत महत्त्वाचे आणि धक्कादायक वळण आले आहे. टीआरएफ (द रेझिस्टंट फोर्स) या दहशतवादी संघटनेने अधिकृतपणे या स्फोटाची जबाबदारी स्वीकारली आहे.

सुरक्षा यंत्रणांच्या माहितीनुसार, टीआरएफ ही कुख्यात दहशतवादी संघटना लश्कर-ए-तैयबाची एक 'फ्रंट ऑर्गनायझेशन' म्हणून काम करते. यामुळे दिल्लीतील स्फोट थेट काश्मीर-आधारित दहशतवादी कारवायांशी जोडला गेला आहे.

टीआरएफने स्फोटाची जबाबदारी स्वीकारताना हा हल्ला काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर करण्यात आल्याचे संकेत दिले आहेत. यातून टीआरएफने आपल्या कारवाया केवळ काश्मीरपुरत्या मर्यादित नसून, देशाच्या मुख्य भूभागापर्यंत घुसण्याचा कट रचला आहे.

एका बाजूला तपास यंत्रणा स्फोटातील 'व्हाईट-कॉलर' दहशतवादी मॉड्यूल आणि अल फलाह विद्यापीठातील डॉक्टरांच्या नेटवर्कचा तपास करत असतानाच, आता टीआरएफच्या या दाव्यामुळे संपूर्ण कट आणि त्याचा विस्तार अधिक व्यापक झाला आहे. राष्ट्रीय तपास संस्था आता या दाव्याची सत्यता पडताळून पाहत असून, 'व्हाईट-कॉलर' नेटवर्कचा टीआरएफ/लश्करशी थेट संबंध आहे का, याचा कसून तपास सुरू आहे. टीआरएफच्या दाव्यामुळे सुरक्षा यंत्रणांची चिंता वाढली आहे, कारण हा गट काश्मीरमध्येही सक्रिय असून आता त्याने थेट दिल्ली, हरियाणा, राजस्थान या भागात उपस्थिती लावल्याने मोठे आव्हान उभे केले आहे. झी न्यूजने याचे वृत्त दिले आहे.



# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाची वाताहत.

महाराष्ट्र जीत

**वाशीम(प्रविण पट्टेबहादुर)** भारत देश अनेक थोर नर नारीच्या महत्त प्रयासाने आणि बलीदानाने इंग्रजांच्या गुलामीतून १५० वर्षांनंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य झाला.

स्वातंत्र्य मिळाले,परंतु देशाचा कारभार कसा चालवायचा हा प्रश्न होता.नंतर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाचे संविधान २ वर्षे ११ महीने १८ दिवसांत पूर्ण करून देशातील तमाम समाजाला समानता असणारे पंचशील तत्वांवर आधारित ३९५ कलम असणारे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तत्कालीन राष्ट्रपती डॉ राजेंद्र प्रसाद व तत्कालीन प्रधानमंत्री पंडीत जवाहरलाल नेहरू आणी त्यांचे मंत्रीमंडळ यांचे सुपुर्द केले.आणि २६ जानेवारी १९५० पासून लागू झाले. त्यानंतर १९५१ते १९५२ च्या दरम्यान सार्वत्रिक निवडणुका झाल्या.आणि १९६० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापन करण्यात आले.महाराष्ट्र शासनाने त्याकाळी जनपद निवडणुका झाल्या. त्यामध्ये न.प.,पं.स.व जिल्हा परिषद म्हणून शहराचा नगर परिषद व ग्रामीण भागाचा ग्रामपंचायत आणि पंचायत समिती व जिल्हा परिषद मार्फत कारभार सुरू झाला.

यावेळी कॉग्रेस,जनता पार्टी हे प्रमुख पक्ष होते.त्यावेळी सुद्धा




डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा मजूर पक्ष अस्तित्वात होता.आणि वर्चस्व देखील होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे हयातीत आणि नंतरही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या पक्षाचे वर्चस्व होते. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर रिपब्लिकन पक्षाला हळूहळू उतरती कळा लागली.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर दादासाहेब गायकवाड यांचे पासून ते राजाभाऊ खोब्रागडे, दादासाहेब रा.सू.गवई,राजा ढाले, नामदेव ढसाळ, रामदास आठवले, प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर,प्रा.जोगेंद्र कवाडे यांचे कार्य प्रणालीमुळे आंबेडकरी जनता आंबेडकरी नेत्यांच्या फुटीमुळे वेगवेगळे रिपब्लिकन गट निर्माण झाले.व जनताही वेगवेगळ्या गटांत विखुरली गेली.वास्तविक पहाता आंबेडकरी जनता ही महाराष्ट्राची सत्ता बदलणारी ताकद असतांनाही व रिपब्लिकन मतदार हे बहुसंख्येने निर्णायक असूनही आजपर्यंत रिपब्लिकन चळवळीची वाताहत पहावयास मिळत आहे.असे समाजसेवक राजकुमार पडघान यांनी वार्तालाप करताना म्हटले आहे.

पुढे राजकुमार पडघान यांनी असेही नमूद केले आहे की, वाशीम जिल्ह्यात देखील आंबेडकरी/रिपब्लिकन चे मतदार हे सत्तेला गवसणी घालणारे असतांनाही प्रस्थापित कॉग्रेस,भाजपा, राष्ट्रवादी,व शिवसेना पक्ष हे वाशीम जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत द्वेषाची भावना बाळगून रिपब्लिकन जनतेला सत्तेपासून वंचीत ठेवण्याचे नेहमीच प्रयत्नशील असतो.परंतु देश राज्य,व जिल्हा पातळीवर रिपब्लिकन गटाच्या फुटीमुळे व त्यांच्या स्वतःच्या वर्चस्वासाठी रिपब्लिकन जनता ही सत्तेपासून दूर तर आहेच,शिवाय दिशाहीन झाली आहे.म्हणून रिपब्लिकन कार्यकर्ता देखील दिशाहीन झाल्याने देश, राज्य व जिल्हा पातळीवरील कार्यकर्ता रिपब्लिकन चळवळ सोडून स्वार्थासाठी आंबेडकरी विचारधारेच्या विरोधात असणार्या राजकीय पक्षात जावून राजकीय भाग्य आजमावीत आहे.वाशीम जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होवून नगर परिषद निवडणूक उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ही १७ नोव्हेंबर आहे.यामध्ये कॉग्रेस , भाजपा, राष्ट्रवादी, शिवसेना या बरोबरच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, वंचीत बहुजन आघाडी,पिपल्स रिपब्लिकन पार्टी,बसपा हे देखील निर्णायक मते असणारी जिल्हयात पक्ष आहेत. वाशीम जिल्ह्यात आंबेडकरी विचार सरणीला मानणारे मतदार हे निर्णायक असतांनाही रिपब्लिकन चळवळीच्या पक्षाला जिल्ह्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कोणतेच स्थान दिसून येत नाही.रिपब्लीकन च्या राष्ट्रीय व राज्य पातळीवर च्या चूकीच्या धोरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत रिपब्लिकन कार्यकर्त्यांसाठी ठोस असे धोरण नसल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाची वाताहत झालेली दिसून येते.

परंतु जिल्ह्यातील स्वतः ला प्रस्थापित समजणाऱ्या पक्षाने विचारात न घेतल्याने रिपब्लिकन मतदारांनी जागृगता दाखवून प्रस्थापितांना त्यांची जागा दाखवुन दिली पाहिजे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाची वाताहत ही राजकीय दृष्ट्या प्रस्थापित पक्षांना ठेच पोहचणारी नक्कीच असेल. म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाची झालेली वाताहत प्रस्थापित पक्षांच्या नेत्यांबरोबरच रिपब्लिकन नेते देखील तेवढेच जबाबदार असतील या मध्ये रिपब्लिकन मतदार हा दिशाहीन झाला असल्यामुळे आपल्या स्वार्थासाठी स्वतः ला आंबेडकरी आव आणून आंबेडकरी समजणारे नेते व मतदार देखील आंबेडकरी विचार सरणीच्या विरोधात असणार्या पक्षात प्रवेश करून उमेदवारी मिळवत आहेत.याला रिपब्लिकन नेत्यांबरोबरच आंबेडकरी मतदार तेवढाच जबाबदार आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाची वाताहत झालेली दिसून येत आहे.

**राजकुमार पडघान(वाशिम)**
**मो.नं.9623515032**

### वाशीम नगराध्यक्ष पदासाठी जेष्ठ समाजसेवक अनिल केंदळे यांना भाजपाची उमेदवारी जाहीर.

#### अनिल केंदळे हे आज भरणार नगराध्यक्ष पदाचा अर्ज

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादूर)** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सर्वत्र नगरपंचायत नगरपरिषद निवडणुका पार पडत आहेत. दिनांक 17 नोव्हेंबर हा दिवस नगरपरिषद निवडणुकीत अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. विविध राजकीय पक्षाच्या वतीने तथा अपक्षांनी देखील आपला उमेदवारी अर्ज दाखल केलेला आहे. त्याच अनुषंगाने आता भाजपाने देखील आपली नगराध्यक्ष पदाची पूर्ण तयारी केलेली आहे. भाजपाच्या वतीने नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार म्हणून वाशिम शहरातील प्रसिद्ध व्यावसायिक तथा समाजसेवक अनिल केंदळे यांना जाहीर झालेली आहे. अनिल केंदळे हे आज दिनांक 17 नोव्हेंबर रोजी भाजपा पदाधिकारी यांचे समवेत आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. भाजपाच्या वतीने दिनांक 16 नोव्हेंबर रोजी अधिकृत पक्षाचा एबी फॉर्म देखील अनिल केंदळे यांना दिला असल्याची विश्वसनीय सूत्रांकडून माहिती आहे.हा ए बी फॉर्म देते वेळेस भाजपाचे निवडणूक प्रभारी राजू पाटील राजे,माजी नगराध्यक्ष अशोक हेडा,रामभाऊ ठेंगडे,उमेश मोहळे यांच्यासह अन्य जन उपस्थित होते.



महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

१ २ ३ ४ ५ ६

## कुपोषणाबाबत उदासीनता

एकीकडे देश तिसरी महासत्ता होण्याच्या दिशेने घोडदौड करत असल्याची जोरदार चर्चा होत असताना त्याचवेळी मेळघाटसारख्या अतिदुर्गम भागात लहान बालके कुपोषणामुळे माना टाकत आहेत. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा एक असा आदिवासी प्रदेश आहे जिथे कुपोषणाचे सर्वाधिक रुग्ण आढळणाऱ्या चिखलदरा आणि धारणी तालुक्यात गेल्या वर्षी दहा हजारांवर बालके कुपोषित असल्याचे सरकारी आकडेवारीतूनच उघड झाले होते. कुपोषण कमी करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार दरवर्षी कोट्यवधींचा खर्च करत असतानाही कुपोषणाचे प्रमाण कमी होण्याचे चिन्ह दिसत नाही. हा प्रश्न आताच ऐरणीवर आला असेही नाही. कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूंच्या दाहक समस्येवर उच्च न्यायालय २००६ सालापासून निर्देश देत आले आहे. तरीही मेळघाटात जूनपासून अवघ्या सहा महिन्यांपर्यंतच्या काळात कुपोषणामुळे ६५ बालकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आल्याने आश्चर्य व्यक्त करत उच्च न्यायालयाने सरकारवर ताशेरे ओढले आहेत. पुढील सुनावणीला चार विभागांच्या प्रधान सचिवांना हजर राहण्याचे निर्देश दिल्याने याबाबत न्यायालय किती गंभीर आहे हे दिसून येते. ही अत्यंत विदारक परिस्थिती आहे. सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न इतक्या सहजतेने घेतला जात असल्याचे आणि या गंभीर समस्येविषयी प्रचंड उदासीनता दाखवली जात असल्याचे चित्रही भयानक असल्याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. हजारो कोटींचे गैरव्यवहार करण्यात गुरफटलेल्या नेतेमंडळींना मेळघाटासारख्या आदिवासी क्षेत्राकडे लक्ष देण्यासाठी वेळ कसा असावा? न्यायालयात गेल्याने किमान या प्रकरणाची किमान चर्चा तरी होत आहे. अन्यथा तिथल्या मृत्यूंच्या घटनांचे कुणालाच काही देणेघेणे नाही, हे स्पष्ट आहे.

> **मेळघाटात जूनपासून अवघ्या सहा महिन्यांपर्यंतच्या काळात कुपोषणामुळे ६५ बालकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आल्याने आश्चर्य व्यक्त करत उच्च न्यायालयाने सरकारवर ताशेरे ओढले आहेत. आता केवळ तात्पुरती मलमपट्टी करण्याऐवजी या भागातील आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकारची इच्छाशक्ती हवी.**

गेल्या दोन दशकांपासून हा प्रश्न अधूनमधून चर्चेत येत असताना त्यावर कायमस्वरूपी उपाय योजला जात नाही. हे उपाय करतो आहोत, असे दाखवले जात असले तरी त्या उपायांचा अपेक्षेइतका परिणाम का साध्य होत नाही, याचा विचार करून त्याच्या मुळाशी जावयास हवे. न्यायालयाने खरडपट्टी काढण्याचा हा काही पहिलाच प्रसंग नाही. यापूर्वीही अनेकदा न्यायालयाने सरकारचे याच समस्येसंदर्भात कान उपटले आहेत. पण तरीही सरकार परिणामकारक काम करताना दिसत नाही. एकूणच सरकार आणि सारी यंत्रणा कोडगी झाली आहे. अनेक सामाजिक संस्थाही या भागात याच संवेदनशील विषयावर काम करताना दिसतात. गेल्या दहा वर्षांमध्ये झालेल्या कुपोषणाच्या अभ्यासात सर्वच वयोगटांमध्ये कुपोषणाचे प्रमाण सर्वात जास्त असल्याचे आढळले. चुकीचे बालसंगोपन हे मुलांच्या कुपोषणाचे एक प्रमुख कारण आहे. लग्नाचे कमी वय, माता आणि मुलांचे आजारपण, दोन मुलांमधील कमी अंतर अशी इतरही अनेक कारणे आहेत. या भागात उपजत म्हणजे गर्भातच बाळाचा मृत्यू तसेच मातामृत्यूचे प्रमाण भयावह आहे. येथे ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य पथके, फिरती पथके यासह इतरही यंत्रणांमार्फत उपचार आणि उपाय केले जात असल्याचे सांगण्यात येत असताना मुलांचे मृत्यू रोखण्यात का अपयश आले आणि अपेक्षित परिणाम का मिळाला नाही, याची कारणे शोधण्याची जबाबदारी सरकारची आहे. काही पाहण्यांमध्ये कुपोषित मुलांसाठी देण्यात येणारे सरकारी योजनांचे फायदे बहुतेकदा संपूर्ण कुटुंबाला मिळत होते आणि त्यामुळे पोषण कमी होत गेल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पोषण संपूर्ण कुटुंबासाठी दिले गेले पाहिजे आणि योग्य पोषण शिक्षणावरही भर दिला पाहिजे, असा निष्कर्ष काढण्यात आला होता. तसेच अन्नवाटप आणि उत्पन्न वाढवण्यामुळेही कमीत कमी दुष्परिणाम होतील, अशीही अटकळ होती. मात्र अशा निष्कर्षांबाबत प्रभावी अंमलबजावणी होते का, हा प्रश्न आहे. आहारासोबतच इतरही अनेक मुद्दे आहेत जे नजरेआड करता येणार नाहीत आणि कुपोषण रोखण्यासाठी त्यावर दीर्घकालीन योजना राबवण्याची गरज आहे. मेळघाट हे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक या पातळ्यांवरही अतिकुपोषित आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे निसर्गसंपन्न असूनही हा प्रदेश नैसर्गिक साधनांबाबतही कुपोषितच आहे. पाऊस भरपूर पडत असला तरी पाणी जमिनीत मुरतच नाही. पावसाचे सर्व पाणी वाहून जात असल्याने जमीन सुपीक असली तरी शेतकऱ्यांसाठी पाणी उरत नाही. सरकारच्या योजना आणि सवलती अशा सर्व लोकांपर्यंत पोहचत असतीलच याची खात्री नाही. शैक्षणिक पातळीवरही खूपच गंभीर समस्या आहे. शहरातील मराठी शाळा ओस पाडत असताना येथील शाळांची आणि तेथील विद्यार्थ्यांची अवस्था कशी असेल, याचा अंदाज बांधता येतो. म्हणूनच केवळ तात्पुरती मलमपट्टी करण्याऐवजी या भागातील आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकारने कायमस्वरूपी योजना राबवल्या तरच त्याचा दूरगामी परिमाण साध्य होऊ शकतो. त्यासाठी सरकारची इच्छाशक्ती मात्र हवी.

# गाझामधील या हानीचे काय? जबाबदारी कुणाची?

पश्चिम आशियातील इस्त्रायल आणि गाझा यांच्यातील संघर्षाची जगभर विविध कारणांनी चर्चा झाली आणि होत आहे. हमास या दहशतवादी गटाबद्दल, त्यांच्या क्रूर हल्ल्यांबाबत, इस्त्रायलच्या आक्रमकतेविषयी, त्यांच्या अत्याधुनिक संरक्षण सामग्रीबद्दल, मानवतेला काळे फासणाऱ्या आक्रमक हल्ल्यांविषयी, नेतन्याहू यांच्या अमानवी दृष्टिकोनाबाबत आणि बरेच काही. दोघांमध्ये संघर्षविराम झाल्यानंतर स्थिती पूर्ववत होईल अशी आशा जगाला आहे. अत्यल्प प्रमाणात हल्ले अजूनही सुरू असले तरी उद्ध्वस्त गाझातील भयावह स्थिती हळूहळू समोर येत आहे. तेथील जनजीवनाची झालेली दुर्दशा इथपासून विविध क्षेत्रांवरील आघातांची दाहकता मन सुन्न करणारी आहे. त्यातच आता संयुक्त राष्ट्राने एका अहवालातून गाझामधील पर्यावरण हानीवर प्रकाश टाकला आहे. हा अहवाल अक्षरशः घाम फोडणाराच आहे. युद्ध आणि त्याच्या परिणामांमध्ये पर्यावरणाचा फारसा उल्लेख किंवा चिंता व्यक्त केली जात नाही. मात्र, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि रासायनिक शस्त्रास्त्रांच्या काळात पर्यावरणाची किती जबर हानी होते हे या अहवालाने उजेडात आणले आहे.

संयुक्त राष्ट्राच्या या अहवालानुसार, गाझामधील तब्बल ९७ टक्के झाडे नष्ट झाली आहेत. म्हणजेच, हिरवळीविना हा परिसर उघडा बोडका बनला आहे. त्याचबरोबर हल्ल्यांमुळे उद्ध्वस्त झालेल्या इमारतींचा तब्बल ६१ दशलक्ष टन कचरा गाझा पट्ट्यात साचला आहे. या साऱ्याचा गंभीर परिणाम तेथील पर्यावरण आणि मानवी आरोग्यावर होत आहे. पाणीपुरवठाही बाधित झाला आहे. ज्यामुळे संसर्गजन्य रोगांचा प्रसार वेगाने होत आहे. ही हानी भरून काढण्यासाठी अनेक दशके लागू शकतात, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. दूषित पाण्यामुळे अतिसाराचे गंभीर रुग्ण ३६ पटीने वाढले आहेत. त्याचप्रमाणे, हेपेटायटीस ए-संबंधित काविळीचे रुग्ण ३८४ पटीने वाढले आहेत. गाझामधील पाच लाखांहून अधिक लोक दुष्काळासारख्या गंभीर परिस्थितीसोबतच सुमारे १० लाख लोक अन्नटंचाईचा सामना करत आहेत.

गाझा पट्ट्यात सुमारे अडीच लाख इमारती होत्या. बॉम्ब, क्षेपणास्त्र आणि गोळ्यांच्या हल्ल्यांमुळे यातील ७८ टक्के इमारती खराब झाल्या आहेत किंवा पूर्णपणे कोसळल्या आहेत. त्यामुळे सुमारे ६१ दशलक्ष टन कचरा जमा झाला आहे. विशेष म्हणजे, हा कचरा इजिप्तच्या १५ ग्रेट पिरॅमिड किंवा २५ आयफेल टॉवर्सच्या आकाराइतका आहे. एवढा कचरा हटवणार कसा आणि कुठे, हा सुद्धा प्रश्नच आहे. या इमारतींच्या अंदाजे १५ टक्के ढिगाऱ्यामध्ये एस्बेस्टोस, औद्योगिक कचरा आणि जड धातू यासारखे धोकादायक पदार्थ असण्याचा धोका आहे. धूळ आणि कचऱ्याने तेथील रहिवासी त्रस्त झाले आहेत. गाझामध्येही बांधकाम आणि अन्य कचऱ्याचा ढीग दिसतो आहे, पण त्यापलीकडे झालेला मोठा दाह अद्यापही अदृश्यच आहे. तेथील पर्यावरणीय हानी भरून काढण्यासाठी काही दशके नाही तर शतके लागतील, असेही हा अहवाल सांगतो.

संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमाचा (युनेप) हा अहवाल खरं तर संपूर्ण जगाचे डोळे उघडवणारा आहे. अर्थात त्याची दखल घेतली तरच अन्यथा पहिल्या पानावरून पुढे असे चित्र सुरू राहील. गाझा पट्टीतील दोन वर्षांच्या संघर्षामुळे तेथील माती, स्वच्छ पाणीपुरवठा आणि किनारपट्टीचे गंभीर नुकसान झाले आहे. जे काही पिण्याचे आणि स्वच्छ पाणी होते ते प्रचंड दूषित बनले आहे. विशेष म्हणजे हे पाणी मुळातच अल्प प्रमाणात होते. गाझा पट्ट्यातील जलवाहिन्या आणि सांडपाणी व्यवस्था प्रचंड कोलमडली आहे. त्यामुळे शौचासाठी खड्ड्यांचा वापर सुरू झाला आहे. काही भागात तर उघड्यावरच हा प्रकार होत आहे. गाझा पट्ट्यातील एक लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे गाझाची बहुतांश लोकसंख्या पाण्यासाठी भूगर्भातील पाण्यावर अवलंबून आहे. मात्र हल्ले आणि कचऱ्यामुळे भूजलही प्रभावित झाले आहे.

पाण्याचे स्त्रोत प्रदूषित झाल्याने तेथे अतिशय बिकट जलदुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे आणि आता तर दूषित पाण्याने संसर्गजन्य रोग वेगाने पसरत आहेत. तेथील परिस्थिती इतकी भयानक आहे की गंभीर अतिसाराने नागरिक हैराण झाले आहेत. आरोग्य यंत्रणेच्या माहितीनुसार, अतिसाराच्या घटनांमध्ये ३६ पट वाढ झाली आहे, तर हेपेटायटीस ए संबंधित कावीळच्या रुग्णांमध्ये तब्बल ३८४ पट वाढ झाली आहे. उलट्या आणि जुलाबाने रुग्ण बेजार झाले आहेत. त्यांना एक तर पाणी मिळत नाही. जे मिळाले त्याने रोग जडत आहे. आरोग्य यंत्रणाही खिळखिळी झाल्याने उपचारही मिळत नाहीत. त्यामुळे तेथील रुग्ण अक्षरशः तडफडत आहेत.

गाझा पट्ट्यातील झाडे आणि हिरवळ जवळपास नाहीशी झाली आहे. अहवालातील आकडेवारीनुसार, २०२३ पासून ९७ टक्के झाडे, ९५ टक्के झुडपे आणि ८२ टक्के हंगामी पिके नष्ट झाली आहेत. अशा परिस्थितीत, मोठ्या प्रमाणात अन्न उत्पादन ठप्प झाले आहे. त्यामुळे अन्नधान्याचीही प्रचंड टंचाई आहे. यामुळे तेथे उपासमार आणि कुपोषणाचा फेरा सुरू झाला आहे. दरम्यान, गाझामधील पाच लाखांहून अधिक लोकसंख्या दुष्काळाचा, तर सुमारे १० लाखांहून अधिक अन्नाच्या तीव्र टंचाईचा सामना करत आहेत. बॉम्ब, क्षेपणास्त्र, तोफगोळे अशा अस्त्रांचा वापर संघर्षात झाला आहे. त्यामुळे गाझातील मातीच्या नैसर्गिक संरचनेवरही परिणाम झाला आहे. यामुळे तिची पाणी शोषण्याची क्षमता कमी झाली आहे. परिणामी पूर येण्याचा धोका वाढला आहे. भूजल पुनर्भरणही कमी झाले आहे. ही हानी भरून न येणारी अशीच आहे.

अहवालात नमूद करण्यात आले आहे की, जून २०२४ मधील सर्वेक्षणाच्या तुलनेत परिस्थिती लक्षणीयरीत्या बिकट झाली आहे. उदाहरणार्थ, कचऱ्याचे प्रमाण आता ५७ टक्क्यांनी वाढले आहे, जे २००८ पासून गाझामधील सर्व संघर्षांमुळे निर्माण झालेल्या कचऱ्याच्या २० पट आहे. गाझाच्या पर्यावरणीय नुकसानाची दखल घेण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात ३० शिफारशी देखील देण्यात आल्या आहेत. यामध्ये पाणी आणि सांडपाण्याच्या पायाभूत सुविधांची जलद पुनर्बांधणी, पद्धतशीर माती चाचणी, शक्यतितक्या ठिकाणी कचरा हटवणे आणि पुनर्वापर करणे तसेच शस्त्रांच्या अवशेषांची सुरक्षित विल्हेवाट लावणे आदींचा समावेश आहे. गाझाचे पर्यावरण केवळ काळजीपूर्वक, समावेशक आणि वैज्ञानिक नियोजनाद्वारेच सुधारता येऊ शकते, असेही हा अहवाल सांगतो.

संयुक्त राष्ट्राच्या पर्यावरणविषयक कार्यक्रमाचे कार्यकारी संचालक इंगर अँडरसन म्हणतात की, 'गाझातील परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. जर हे असेच चालू राहिले तर भविष्यातील पिढ्यांच्या आरोग्यावर आणि जीवनावर त्याचा खोलवर परिणाम होईल. गाझातील मानवतावादी संकट संपवणे ही सर्वोच्च प्राथमिकता आहे. जीव वाचवण्यासाठी, मानवतावादी मदत पोहोचवण्यासाठी, आवश्यक सेवा पूर्ववत करण्यासाठी स्वच्छ पाण्याचा पुरवठा आणि कचरा साफ करणे आवश्यक आहे. शिवाय, गाझाच्या लोकांच्या अन्न आणि पाण्याच्या सुरक्षिततेसाठी तसेच त्यांच्या चांगल्या भविष्यासाठी माती, पाण्याचे स्त्रोत आणि वनस्पती पुनर्संचयित करणे महत्त्वाचे असेल.' युद्ध पश्चात होणाऱ्या या अभूतपूर्व हानीची कुणीही कल्पना केली नसेल. ती प्रत्यक्षात अवतरली आहे त्यास माणूसच कारणीभूत आहे. असाच प्रकार युक्रेनमध्येही असण्याची शक्यता आहे. हे असे कुठवर सुरू राहणार? हे प्रकार थांबणार का? की इथून पुढे ते वाढणारच?

**संरक्षण, सामरिकशास्त्र, आंतरराष्ट्रीय घडामोडी, परराष्ट्र संबंध अभ्यासक**

# जमीन, प्रकल्प आणि पैसा...

सध्या महाराष्ट्रात आणि देशात विकासयुग अवतरले आहे. त्यामुळे या विकासासाठी जमिनी या सोन्याच्या खाणी ठरत आहेत. मग त्या त्या शेतजमिनी असोत, शासकीय जमिनी असोत, आदिवासी जमिनी असोत, वन वा वतन जमिनी असोत, डोंगर असोत किंवा नद्या, नाले, समुद्राकाठच्या जमिनी असोत... त्या साम-दाम-दंड-भेदाने आपल्याकडे कशा येतील याचा विचार धनिक, उद्योजक, राजकारणी, बिल्डर आणि दलालमंडळी करत आहेत. मग तिथे सर्व प्रस्थापित कायदे मोडीत काढून फक्त फायद्याचा विचार होतो. या वाहत्या गंगेत हात धुवून घेण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांपासून राजकारण्यांपर्यंत सर्वत्र लाइन लागते आणि सर्वच जण या विकासाचे लाभार्थी बनून जातात. सध्या चर्चेत असणारे पुण्यातील मुंडवा जमिनीचे प्रकरण हिमनगाचे एक टोक आहे. बाकी सर्व जमिनीखाली आणि पाण्याखाली गाडलेलेच राहणार आहे.

पुण्यातील मोक्याच्या ठिकाणच्या मुंडव्यातील आधी महार वतन असणाऱ्या आणि नंतर राज्य सरकारने ताब्यात घेऊन केंद्र सरकारच्या बॉटेनिकल गार्डनला दिलेली ४० एकर जागा शासनाची परवानगी न घेता फेरफार करून पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीला विकण्यात आली. विशेष म्हणजे साधारण १८०० कोटी बाजारमूल्य असणारी ही जागा केवळ ३०० कोटी रुपयांना या अमेडिया कंपनीला देण्यात आली आणि येथे प्रस्थापित आयटी पार्क दाखवून २१ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी रद्द करत केवळ ५०० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर या जमिनीची नोंदणी करण्यात आली. या व्यवहारातील ३०० कोटी रुपये कुठेही कागदोपत्री दिल्याची नोंद नाही. ही शासकीय जमीन जिल्हाधिकाऱ्यासारख्या सक्षम अधिकाऱ्याकडून वा शासनाकडून अधिकृतरीत्या हस्तांतरित केल्याचे पुरावे नाहीत. शितल तेजवानी यांनी महार वतन म्हणून मिळालेल्यांच्या वंशजांकडून पॉवर ऑफ अटर्नी मिळवून हा व्यवहार केल्याचे बोलले जाते. जमीन गैरव्यवहार उघडकीस आल्यानंतर अमेडिया कंपनीच्या ९९ टक्के भागीदार असणाऱ्या मालक पार्थ पवारवर कारवाई न करता केवळ कागदोपत्री १ टक्के भागीदारी असणाऱ्या दिग्विजय पाटलांसह शितल तेजवानी, तहसीलदार सूर्यकांत येवलेसह इतर काहींवर भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(५), ३१८ (४) आणि ३(५) खाली गुन्हा दाखल झाला आहे. इतका मोठा शासकीय जमिनीचा व्यवहार करण्याचा अधिकार फक्त तहसीलदार दर्जाच्या अधिकाऱ्याला आहे का? यात आणखी कोणत्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे? कागदपत्रांमध्ये बँक व्यवहाराचा उल्लेख नाही. म्हणजे ३०० कोटींचा रोखीने व्यवहार झाल्याचा संशय आहे. पण हा पैसा आला कुठून? हेही प्रश्न अनुत्तरित आहेत. ही फार मोठी साखळी आहे. ती उलगडायला पाहिजे. पण तसे होणार नाही. पुण्यातीलच बोपोडीमधील १४ एकरच्या आसपास राज्य सरकारच्या कृषी खात्याची जमीन याच अमेडिया कंपनीने अनधिकृतरीत्या ताब्यात घेतली आहे. या सगळ्या व्यवहारांमध्ये मोठा आशीर्वाद आणि सरकारी पाठबळ असल्याशिवाय काहीच होऊ शकत नाही. व्यवहार रद्द केला म्हणून कारवाई करायची नाही का? की मोठ्या धेंडांना कायदा वेगळा आणि सामान्य जनतेला कायदा वेगळा अशी राज्यातील व देशातील परिस्थिती आहे? सरकारने सरसकट सरकारी जमिनी कवडीमोल भावाने खासगी उद्योजकांना देण्याचा धडाका लावला असताना या पार्थलाही तोच न्याय लावलाय का? हे सगळे प्रश्न अनुत्तरितच राहणार आहेत का? की सगळ्या गोष्टी पैशाच्या आणि सत्तेच्या चष्म्यातूनच आपण पाहणार आहोत का?

हा व्यवहार रद्द झाल्याची घोषणा सरकारला करावी लागली. त्यामुळे हा व्यवहार पूर्ण झाला होता हे स्पष्ट आहे. त्यामुळेच सरकारला तो रद्द करण्याची नामुष्की ओढवली. सरकार एका महिन्यात तपास करून कारवाई करणार आहे. पण खुद्द वडील उपमुख्यमंत्री म्हणून सत्तेत असताना योग्य तपास होऊन कारवाई होईल ही शक्यता दुरापास्त आहे. शासकीय जमिनींचे अशा प्रकारे बेकायदेशीररीत्या हस्तांतरण होते आणि वरिष्ठ पातळीवर काही सुगावा लागत नाही आणि माध्यमांमध्ये बोलबाला झाल्यानंतर सरकारला माघार घ्यावी लागते हे दुर्दैवी आहे.

सरकार स्वतःची क्लीन इमेज तयार करण्यासाठी सगळ्याच प्रकरणात क्लीनचिट देताना दिसत आहे. या प्रकरणातील मोठ्या हस्तींना वाचवण्याचे सर्व प्रयत्न राजसत्तेकडून झालेले आहेत. पुण्यातीलच जैन बोर्डिंग जमीन गैरव्यवहार प्रकरणातही सरकारमधीलच मंत्री असताना कुणावरही कारवाई झाली नाही आणि व्यवहार रद्द करून सगळे क्लिअर केले गेले. फलटण डॉक्टर आत्महत्या प्रकरणातही सरकार तपासाआधीच माजी खासदाराला क्लीनचिट देते आणि तपासातली हवाच काढून घेते. क्लीनचिटच्या नादात आपण न्याय विसरून चाललो आहोत. प्रकल्पांच्या, विकासाच्या व सत्तेच्या नावाखाली हे होत असेल तर ते अधिक भयावह आहे.

शासकीय जमिनींसोबत खासगी जमिनीची लूटमार हा मोठा विषय आहे. सरकार नवनवे प्रकल्प जाहीर करते आणि पहिला वरवंटा फिरतो तो शेतकऱ्यांवर! प्रकल्प जाहीर होणार हे आधी माहीत होते ते सत्ताधारी, राजकारणी, सरकारी बाबू, कॉन्ट्रॅक्टर, दलाल यांना. जनतेकडे या प्रकल्पाची माहिती पोहोचण्याआधीच कवडीमोल भावाने जमिनी लुटण्याचा खेळ सुरू होतो. मग याच जमिनी दामदुप्पट भावाने सरकारलाच विकल्या जातात. अगदी किरकोळ भावात ही जमिनीची लयलूट सुरू आहे. यासाठी सर्व कायदे गुंडाळून ठेवले जातात. हेच याआधीच्या प्रकल्पापासून समृद्धी-बडोदा हायवेत झाले. तेच आता वाढवण बंदर, शक्तिपीठ महामार्ग, पॉवर प्रोजेक्ट आणि इतर प्रकल्पांबाबत हे सुरू आहे. सगळेच प्रकल्पांचे लाभार्थी होतात, मात्र मूळ मालक असलेला शेतकरी भरडला जातोय. प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांना कसे लुटले जातेय याच्या सुरस कथा सर्व सरकारी कार्यालयात पाहायला मिळतील. आता या जमिनींना इतका सोन्याचा भाव आला आहे की दिसतील त्या जमिनी ओरपण्याचे काम सुरू झाले आहे. यातूनच मुंबईतील खंडणी संस्कृती मागे पडून नवी विकासनगरी असलेल्या सुसंस्कृत पुण्यात कोयता गँगचा कहर सुरू झाला आहे. हाच कोयता गँगचा काटा समृद्ध सांगलीकडे सरकताना दिसतोय. भविष्यात राज्यभरात हे लोण पसरायला वेळ लागणार नाही. गोरगरीबांच्या जमिनी ओरबाडून विकासाचे इमले बांधायच्या स्पर्धेतून हा कहर सुरू आहे. याला राजाश्रय मिळाल्याशिवाय हे शक्य नाही. एकीकडे निसर्गाच्या कहराने शेती अडचणीत आली असताना या सुलतानी संकटामुळे हाती असलेले वावरही हातून निघून जातेय की काय, अशी परिस्थिती आहे.

धर्मासाठी लढणाऱ्या सरकारने शेतकरी आणि सरकारी धर्मासाठीही आता जागले पाहिजे. 'रयतेच्या काडीलाही धक्का लागता कामा नये', असे छत्रपती शिवाजी महाराजांनी सैन्याला सांगितले होते. याच छत्रपतींच्या आशीर्वादाने सत्तेत आलेल्या सरकारने रयतेच्या खासगी आणि सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करण्याचे आद्य कर्तव्य पार पाडले पाहिजे. या सरकारने आपल्या जमिनीचे बेकायदा व्यवहार थांबवले पाहिजेत. 'हे लुटीचे सरकार' म्हणून शिक्का लागणे सरकारसाठी कलंक असेल. सरकारने हा कलंक जरूर पुसावा. त्यासाठी सत्तेची दादागिरी मोडून काढावी लागेल.

**मुंबई उच्च न्यायालयातील वकील**

**मतदार यादी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देश**

# एका मतदान केंद्रावर ८०० ते ९०० मतदार

**नवी मुंबई :** आगामी नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना व आरक्षण सोडत प्रक्रिया सुव्यवस्थितरीत्या पूर्ण झाल्यानंतर आता मतदार यादी प्रसिद्धीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी मतदार यादी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे तसेच एका मतदान केंद्रावर ८०० ते ९०० मतदार असतील, असे निर्देश दिले आहेत.

मतदान केंद्र निश्चितीविषयी झालेल्या आढावा बैठकीत डॉ. शिंदे यांनी निवडणुकीसंबंधी कामकाज वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकारी व कर्मचारी वर्गाला दिल्या. यावेळी निवडणूक विभागाचे उप आयुक्त भागवत डोईफोडे, परिमंडळ दोनचे उप आयुक्त संजय शिंदे, तसेच विविध विभागप्रमुख उपस्थित होते.



> राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या मतदार यादी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच अधिकाधिक नागरिकांपर्यंत या प्रक्रियेची माहिती पोहोचावी. मतदान केंद्र निश्चिती करताना सर्व निकषांचे पालन व्हावे.
> – **डॉ. कैलास शिंदे,** आयुक्त नवी मुंबई महापालिका

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र मतदार यादी तयार केली जात नाही. भारत निवडणूक आयोगाने तयार केलेल्या विधानसभेच्या मतदार याद्यांवर आधारित प्रभागनिहाय यादी महापालिकेने तयार करायची असते. त्यानुसार १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी प्रभागनिहाय विभाजित करून प्रारूप यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

या यादीवर हरकती व सूचना नोंदविण्यासाठी निश्चित मुदत दिली जाणार असून, नव्याने नावे समाविष्ट केली जाणार नाहीत. मात्र लेखनिक त्रुटी, चुकीच्या प्रभागातील नावे, मृत मतदारांची नोंद इत्यादी दुरुस्त्या करण्यास परवानगी असेल. प्राप्त हरकती व सूचनांवर विचार करून अंतिम मतदार यादी तयार केली जाणार आहे. यासाठी विविध विभागप्रमुखांना प्राधिकृत अधिकारी तर इतर कर्मचाऱ्यांना सहाय्यक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. मतदान केंद्रांच्या निवडीत मतदारांना जास्त अंतरावर जावे लागू नये, याची काळजी घेण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले. प्रत्येक केंद्रावर पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासही त्यांनी सूचना दिल्या.

# पिंपरीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार?

## सुप्रिया सुळे यांचा प्रस्ताव; शहरात राजकीय चर्चांना ऊत

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीपूर्वी शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गट एकत्र येण्याची चाचपणी सुरू झाल्याची माहिती समोर आली आहे. पिंपरीत आघाडी करण्याचा प्रस्ताव राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांना दिल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी केला आहे. या दाव्यामुळे दोन्ही गट एकत्र लढण्याची शक्यता राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे.

पिंपरी-चिंचवड शहराला एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळख होती. तब्बल १५ वर्षे या शहरावर राष्ट्रवादीची एकहाती सत्ता होती. मात्र, २०१७ मध्ये भाजपने हा गड काबीज केला आणि राष्ट्रवादीचा प्रभाव कमी झाला. सध्या अजित पवार यांचा गट महायुतीचा घटक असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजप महापालिका निवडणूक स्वबळावर लढविणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे अजित पवार गटालाही स्वतंत्र लढतीसाठी सज्ज राहण्याचे संकेत मिळत आहेत.दरम्यान, शरद पवार गटाची पिंपरी-चिंचवडमधील संघटनात्मक ताकद कमी झाली आहे. पक्षासोबत फक्त दोन माजी नगरसेवक असल्याचे सांगितले जाते. भोसरीतील माजी उमेदवार अजित गव्हाणे हे समर्थकांसह पुन्हा अजित पवार गटात गेले आहेत, तर चिंचवडचे माजी उमेदवार राहुल कलाटे तटस्थ भूमिकेत आहेत.

या पार्श्वभूमीवर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गटांनी स्थानिक स्तरावर एकत्र येऊन भाजपला टक्कर देण्यासाठी आघाडीचा पर्याय शोधण्याची हालचाल सुरू केल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

## केकतउमरा जिल्हा परिषद शाळेत आद्य क्रांतिवीर बिरसा मुंडा यांची जयंती उत्साहात साजरी.

**वाशिम(प्रतिनिधी)** आज दिनांक 15 नोव्हेंबर 2025 रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा केकतउमरा येथे जननायक बिरसा मुंडा यांची जयंती अनुसूचित जनजाती गौरव दिवस म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक दीपक जावळे हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून माधव कव्हर,राजू सरतापे,हेमंत तायडे,तसेच शाळेचे सर्व शिक्षक उपस्थित होते जयंतीच्या अनुषंगाने शाळेतील विद्यार्थ्यांनी जननायक बिरसा मुंडा यांच्या कार्याबद्दल व जीवन बद्दल माहिती दिली.प्रसंगानुरूप शाळेतील शिक्षकांनी सुद्धा बिरसा मुंडा यांच्या जयंतीच्या निमित्ताने बिरसा मुंडा यांनी केलेल्या सामाजिक योगदानाबद्दल तसेच देशासाठी दिलेल्या योगदानाबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सहावी मधील विद्यार्थ्यांनी केले तर आभार इयत्ता सातवी मधील विद्यार्थ्यांनी मांनले.या कार्यक्रमाला शिक्षक गणेश गोटे, संजय साबळे,सुभाष काकडे हेमंत भगत,शिक्षिका सौ.नंदा आरू,यांच्यासह शाळेतील कर्मचारी दशरथ साळसुंदर हे उपस्थित होते.



## डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत बालदिन उत्साहात साजरा

### केदार भगत यांच्याकडून मुलांना खेळणी व खाऊचे वाटप

पनवेल( प्रतिनिधी–गुरुनाथ तिरपणकर)

नवीन पनवेल येथील डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या परिसराची आकर्षक सजावट, रांगोळ्या आणि विविध उपक्रमांनी संपूर्ण वातावरण रंगतदार झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका सौ. श्रेया जाधव व विद्यार्थ्यांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांना दृकश्राव्य माध्यमातून पंडित नेहरू यांच्याविषयी माहिती दाखवण्यात आली. शिक्षकांनी बालदिनाचे महत्त्व समजावून सांगितले. पूर्व व्यावसायिक गटातील विद्यार्थ्यांनी भाषण केले, तर पूर्व प्राथमिक गटातील मुलांनी गीत सादर केले. थेरपी वर्गातील विद्यार्थ्याने 'चाचा नेहरू' ची वेशभूषा करून आकर्षण ठरला.

बालदिनानिमित्त भारतीय जनता पार्टी पनवेल शहर उपाध्यक्ष केदार सुरेश भगत व त्यांचे सहकारी विद्यार्थ्यांसोबत बालदिन साजरा करण्यासाठी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. श्री. भगत यांनी विद्यार्थ्यांना बालदिनाच्या शुभेच्छा देत शाळेसाठी पुढील काळात मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खेळणी आणि खाऊ (पॉपकॉर्न व आईस्क्रीम) वाटप करण्यात आले.

शेवटी मुख्याध्यापिका सौ. श्रेया जाधव यांनी मान्यवरांचे आभार मानले. संपूर्ण दिवस विद्यार्थ्यांसाठी आनंद, उत्साह आणि मौजमजेने भरलेला ठरला. बालदिनाचा उत्सव शाळेत संस्मरणीय पद्धतीने पार पडला.

## मंगरूळपीर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी चिया पिकावरील विशेष प्रशिक्षण संपन्न.

### प्रशिक्षणात ३०० शेतकऱ्यांचा सहभाग

**वाशिम(प्रतिनिधी)** दिनांक 14 नोव्हेंबर 2025 रोजी मंगरूळपीर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी चिया पिकाचे विशेष प्रशिक्षण कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे प्रशिक्षण सभागृह, वाशिम येथे आयोजित करण्यात आले.अनिसा महाबळे, प्रकल्प संचालक आत्मा, यांनी चिया पिकाची यशोगाथा, चिया बियाण्यांची पौष्टिकता, त्यापासून तयार होणारे पौष्टिक पदार्थ, तसेच आहारातील महत्व याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी Mahavistaar AI App बाबतही माहिती देऊन शेतकऱ्यांना डिजिटल शेतीचा उपयोग सांगितला. कार्यक्रमात उपस्थित शेतकऱ्यांनी चिया सरबताचा आस्वाद घेतला.आरिफ शाह, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वाशिम, यांनी चिया पिकाचा इतिहास, लागवड तंत्रज्ञान, काढणी पश्चात प्रक्रिया, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ, तसेच सेंद्रिय निविष्ठा निर्मिती याबाबत सविस्तर माहिती दिली. श्री सचिन कांबळे तालुका कृषी अधिकारी मंगरूळपीर यांनी सूत्रसंचालन केले.या प्रशिक्षणामध्ये सुमारे ३०० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. चिया लागवडीचे क्षेत्र वाढत असल्याने शेतकऱ्यांनी तंत्रशुद्ध पद्धतीने लागवड करून एकरी उत्पादन व उत्पन्न वाढवावे, यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरले.



शेतकऱ्यांनी सुद्धा उत्स्फूर्तपणे आपले मनोगत व्यक्त केले व चिया लागवड प्रशिक्षणात शिकवल्या पद्धतीने करणार असे आश्वासन दिले.कार्यक्रमाचे आयोजन कृषी विभाग व आत्मा वाशिम यांच्या सहकार्याने करण्यात आले. शेतकऱ्यांनी या प्रशिक्षणाबद्दल उत्साह व्यक्त केला.

## लाखनीतील क्रिश वलथेचा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत झळकला यशाचा झेंडा

**प्रतिनिधी / भंडारा.**

**लाखनी दि. १४ :** स्व. निर्धन पाटील वाघाये महाविद्यालय, लाखनी येथील बी.एस.सी. प्रथम वर्षातील विद्यार्थी क्रिश किशोर वलथे याने शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत आयोजित वार्षिक आंतरमहाविद्यालयीन एथलेटिक्स क्रीडा स्पर्धेत लांब उडी या प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत क्रिश वलथेने 6.46 मीटर इतकी लांब उडी घेत रोप्यपदकाचा मान मिळविला. त्याच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे माजी संचालक (शारीरिक शिक्षण व क्रीडा) डॉ. शरद सूर्यवंशी, डॉ. आदित्य सोनी व डॉ. अनिल भोरे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.

क्रिशने आपल्या यशाचे श्रेय आई–वडिलांना दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश एम. कापसे आणि शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. एस. जी. सहारे यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही क्रिशचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

## वकृत्व स्पर्धेत मनोज बुंधे यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

***भिवंडी (सुनील झळके)***

क्रांतिसूर्य धरतीआबा भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आदिवासी एकता मित्र मंडळ, मनोर यांच्यावतीने *"कला महोत्सव २०२५"* चे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सव अंतर्गत नुकताच पार पडलेल्या वकृत्व स्पर्धेत वाडा तालुक्यातील मनोज वनिता लक्ष्मण बुंधे यांनी प्रथम क्रमांक मिळविला आहे. "क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा" हा विषय त्यांनी वकृत्व स्पर्धेसाठी निवडला होता.

सदर वकृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक नितेश जयवंती, अशोक जाधव यांचा तर,तृतीय क्रमांक निकिता शोभा तुकाराम डगला यांनी मिळवला आहे. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्यांना बक्षिसाची रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. तर




सहभागी स्पर्धकांना सन्मानचिन्ह व सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. सदर महोत्सवाच्या भव्य कार्यक्रमात हा बक्षीस वितरण सोहळा पार पडला.

आदिवासी एकता मित्र मंडळ संस्थापक अध्यक्ष संतोषजी जनाठे, उपाध्यक्ष दामोदरजी कासट व सर्व आदिवासी एकता मित्र मंडळाचे आम्ही आभार व्यक्त करतो की, आमच्यातील कलेला त्यांनी व्यासपीठ मिळवून दिले. अशा कला महोत्सवामुळे आम्हाला पुढे जायला प्रोत्साहन मिळते. पुन्हा एकदा आम्ही आयोजकांचे आभार व्यक्त करतो, अशा भावना मनोज बुंधे यांनी व्यक्त केल्या आहेत.

## वाशिम शहराचे मा.नगराध्यक्ष दीपकराव भांदुर्गे शिवसेना(उबाठा) पक्षाचे माणिकराव देशमुख,भाजपाच्या छायाताई पवार यांच्यासह अनेकांचा शिंदे सेनेत जाहीर प्रवेश.

### *शिवसेना नेत्या तथा आ.भावनाताई गवळी यांच्या उपस्थितीत झाला प्रवेश*

**वाशिम (प्रतिनिधी)** शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे व शिवसेना नेत्या तथा आमदार भावनाताई गवळी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून माजी नगराध्यक्ष दिपकराव भांदुर्गे व उबाठाचे उपजिल्हाप्रमुख माणिकराव देशमुख यांच्यासह अनेकांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.



स्थानिक स्वराज्य निवडणूकीच्या अनुषंगाने अनेकजण शिवसेना पक्षाला पसंती देत आहेत. वाशिम,रिसोड व मालेगाव तालुक्यात अनेकजण दररोज शिवसेनेत प्रवेश करीत आहेत. कविताताई अनिल मोटे व किशोर थोरात उबाठा यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी आ.भावनाताई गवळी पाटील व जिल्हा प्रमुख विजय खानझोडे यांच्या उपस्थितीत माजी नगराध्यक्ष दिपकराव भांदुर्गे,उबाठाचे उपजिल्हाप्रमुख माणिकराव देशमुख,भाजपा महीला आघाडी जिल्हा सरचिटणीस सौ .छायाताई पवार,उबाठाचे किशोर थोरात,शाम खरात,संभाजी ब्रिगेडचे विष्णु मुसळे, राजुभाऊ लाहोटी यांच्यासह अनेकांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विजय खानझोडे,संपर्कप्रमुख हुकुम तुर्वे, विधानसभा समन्वयक नागेश घोपे, किशोर देशमुख, संतोष सुरळकर,तालुकाप्रमुख परम मुसळे, शहर प्रमुख पंकज इंगोले, युवा सेना उपजिल्हाप्रमुख सुमित गोटे, तालुकाप्रमुख मोहन कोल्हे, जावेद परवेज,उपशहर प्रमुख राजूभाऊ सहातोंडे, प्रविण पट्टेबहादुर,रवि वानखेडे,लक्ष्मण गावंडे,गोपाल लव्हाळे,यांच्यासह आदींची उपस्थिती होती.





## नसीमा बी अब्दुल जाहीर यांच्या उमेदवारीला वाढता पाठिंबा

**प्रतिनिधी अकोला**

ज्याच्याकडे संयम आणि सातत्य त्यांना यश लाभते यांचे जिवंत उदाहरण म्हणजे आंबेडकर घराण्याशी म्हणजेच वंचित बहुजन युवा आघाडीचे एकनिष्ठ माजी कोषाध्यक्ष अब्दुल रईस यांची आई नसीमा बी अब्दुल जहीर ह्या पारस सर्कल मधुन वंचित बहुजन आघाडीकडुन इच्छुक उमेदवार असुन यांची लोकप्रियता आणि एकनिष्ठता पाहुन यांना पारस सर्कल मधुन भरघोस पाठिंबा मिळताना दिसतो आहे लोकांमध्ये लोकप्रियता दिसत आहे अब्दुल रईस यांनी वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर तसेच वंचित बहुजन आघाडी मध्ये नेहमी तन मन धनापासुन काम करत आहेत आणि करत राहतील अब्दुल रईस जहिर यांनी वंचित बहुजन आघाडी च्या प्रत्येक आंदोलनामध्ये तसेच लोकसभा, विधानसभा निवडणुकीत चांगले काम केले तरी पारस सर्कल मधुन यांची कामाची दखल घेऊन लोकांनी यांच्या बद्दल आपुलकी दाखवत यांच्या आई नसीमा बी यांना पसंती दर्शवली आहे. नसीमा बी अब्दुल जाहीर यांना उमेदवारी देईल की नाही हे येणारा काळ ठरवेल परंतु अनेक वर्षापासून सामाजिक कार्यातून जनतेतून आलेला एक सर्वसामान्य चेहरा जिल्हा परिषद मध्ये सदस्य म्हणून पुढे यायला काय हरकत आहे? असा सवाल आता जनता करीत आहे.

## भोकर नगरपरिषद निवडणुक नगराध्यक्ष पदासाठी १७ जण तर नगरसेवक सदस्य पदासाठी १४२ जणांचे नामांकन अर्ज दाखल

**भोकर / उत्तम कसबे**

भोकर नगर परिषद सार्वत्रीक निवडणुक नगराध्यक्ष पदासाठी १ जागा असून दि .१० नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर पर्यंत १७ जणांनी नामांकन अर्ज दाखल केले आहे . एकुण प्रभाग ११ असून नगरसेवक सदस्य पदाच्या २२ जागा असुन १४२ जणांनी नामांकन अर्ज दाखल केले असल्याची माहिती निवडणुक निर्वाचन अधिकारी यांनी दिली आहे . नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५ च्या अनुसंघाने २ डिंसेबर रोजी मतदान होणार आहे . आज . दि १७ नोव्हेंबर रोज सोमवार नामांकन अर्ज दाखल करण्याची अंतीम तारीख आहे .

दि १८ नोंव्हेबर रोज मंगळवारी छाननी आहे . दि २५ नोव्हेंबर अर्ज मागे घेण्याची अंतीम तारीख आहे . भोकर नगरपरिषद सार्वत्रीक निवडणुक २०२५ची निवडणुक लढविणारे अनेक इच्छुकांनी विविध राजकीय पक्षाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी मागणी केली असून आजपर्यंत कुठल्याही राजकीय पक्षाचा उमेदवार जाहीर झाला नाही . अजूनही बि फार्म मिळाला नाही . गुडघ्याला बाशींग बांधुन अनेकांनी राजकीय पक्षाकडून निवडणुक लढविण्यांचा निश्चय केला आहे . सत्ताधारी भाजपा पक्ष महाविकास आघाडी वंचित बहुजन आघाडी एमआयएम पक्ष अन्य राजकीय पक्षाकडुन उमेदवारांची चाचपणी सुरु असून कोणत्याही राजकीय पक्षश्रेष्ठींने कुठलाही निर्णय न घेतल्या मुळे इच्छुक उमेदवारांची धाकधुक वाढली आहे . भोकर नगरपरिषद निवडणुक २०२५ ची अट्टीतटीची अस्तीत्वाची लढाई आहे . यंदाच्या नगरपरिषद निवडणुकीत जुने चेहरे की नवे चेहरे त्यापैकी कोण बरे राहतील राजकीय पक्षश्रेष्ठी समोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे . संधी कोणाला मिळणार ह्याकडे सर्वाचे लक्ष लागुन आहे .

## रेल्वे भरती प्रक्रियेत मागासवर्गीय मुला–मुलींना नियमानुसार प्राधान्य द्या, आकाश घुसळे ( जिल्हाध्यक्ष )

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी**
**गोकुळ लोखंडे**



ऑल इंडिया एस सी एस टी रेल्वे एम्पलॉइज असोसिएशन मुंबई मंडळ मध्य रेल सेक्रेटरी डॉ.जे के आर्या साहेब स्टेशन मॅनेजर दादर यांची भेट घेऊन येणाऱ्या रेल्वे भरती या विषयावर चर्चा करण्यात आली या भरती प्रक्रियेमध्ये मागासवर्गीय मुला मुलींना अटी शर्तीनुसार प्राधान्य देण्यात यावे तसेच बेरोजगार तरुण–तरुणींना योग्य मार्गदर्शन करून भरती प्रक्रियेमध्ये प्राधान्य द्यावे अशी चर्चा द्वारे रिपब्लिकन जिल्हाध्यक्ष आय टी सेल आठवले आकाश घूसळे यांनी केले डॉक्टर जे के आर्या यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला व आपण केलेल्या मागणीनुसार योग्य मार्गदर्शन करून मागासवर्गीयांना सर्व अटी शर्तीचे नियमांचे पालन करून त्यांना शासकीय नोकरीत सहभागी करून घेतले जाईल, यावेळी आकाश घुसळे यांच्या वतीने डॉक्टर आर्या यांचा सत्कार करण्यात आला

## ऑर्गनायझर शर्मिला केसरकर यांच्या वाढदिलसाप्रित्यर्थ'मिले सुर मेरा तुम्हारा'हा संगीतमय कार्यक्रम उत्साहात संपन्न

### शर्मिला केसरकर जनजागृती सेवा संस्थेच्या"समाज रत्न पुरस्काराने" सन्मानित

**डोंबिवली**
**(प्रतिनिधी–गुरुनाथ तिरपणकर)**

ऐशी टक्के समाजकारण,वीस टक्के राजकारण,भाजपा चित्रपट कामगार आघाडीच्या डोंबिवलीच्या शहर अध्यक्षा, म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंटच्या संचालिका–ऑर्गनायझर शर्मिला केसरकर यांचा वाढदिवस डोंबिवली येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.वाढदिवसाप्रित्यर्थ शनिवार दिनांक१५नोव्हेंबर२५रोजी सर्वेश हॉल, टिळक चौक, डोंबिवली पूर्व येथे म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंट प्रस्तुत'मिले सुर मेरा तुम्हारा'हा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी जनजागृती सेवा संस्थेच्या"समाज रत्न पुरस्काराने" सन्मानित करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सेवा निवृत्त कमांडिंग ऑफीसर'ई'परिमंडळ, राष्ट्रपती पदक सन्मानित, समता साहित्य अकादमी महाराष्ट्राचे अध्यक्ष




दिलीप नारकर, समुपदेशिका, स्वानंद इन्व्हेस्टाच्या संचालिका चित्रा राऊत, सेवा निवृत्त पोलिस अधिकारी, सिटीझन वेल्फेअर असोसिएशनचे संस्थापक सदस्य दीलीप शिरसाट, डोंबिवली येथील उषा हॉस्पिलिटीचे संचालक, समाजसेवक, जनजागृतीचे सल्लागार अरविंद सुर्वे, महिला उत्कर्ष समिती महाराष्ट्रच्या कार्याध्यक्षा श्रुती उरणकर, ग्लोबल मालवणी संस्थेचे अध्यक्ष सचिन आचरेकर,साई श्रद्धा विविध कार्यकारी सेवा संस्थेचे अध्यक्ष तसेच आम्ही आहोत ना या सामाजिक संस्थेचे कार्याध्यक्ष कैलास सणस, समाजसेविका शितल कदम, जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर आदी मान्यवर उपस्थित होते.सन्मानपत्र, सन्मानचिन्ह,शाल, भेटवस्तू, पुष्पगुच्छ असे समाजरत्न पुरस्काराचे स्वरूप होते.या ऑर्केस्ट्रा मध्ये सोशल मीडिया एक्झिक्युटिव्ह तनया केसरकर,स्पोर्ट्स/सिंगर बी.एन.नायक, सिंगर आणि आयडीएटर प्रज्ञा तांबे,सिंगर अनुराधा कोंडाळकर,विणा, अनुश्री चौधरी, जितेंद्र कांबळी, धनंजय बरबडे, अतुल खरे, अतुल देसाई,इंद्रनिल कंडु, नितीन ठाकर,श्री पेंडसे, भालचंद्र कोंडाळकर, मंगेश पारकर,रवी नाईक, उल्हास मैद, संजय पाटील,बाल कलाकार कियान,वॉईस ऑफ मुकेश राजेंद्र काळे, म्युझिक अरेंजर रितेश अण्ड टीम, व्हिडिओग्राफर संजय सेनगुप्ता या म्युझिक मंत्राच्या सर्व टीमने विशेष परिश्रम घेऊन हा सदाबहार सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीपणे सादर केला. या ऑर्केस्ट्राचे सुत्रसंचालन दिपक पोखरणकर यांनी केले.शेवटी म्युझिक मंत्राच्या संचालिका–ऑर्गनाझर शर्मिला केसरकर यांनी सर्वांचे आभार मानले.

## काजळेश्वर येथे बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी .

**नकुल उपाध्ये / कारंजा लाडः**

कारंजा तालुक्यातील आदिवासी बहुल वस्ती मोठ्या प्रमाणात असलेल्या काजळेश्वर गावी ग्रामपंचायत भवन येथे उलगुलान चे महानायक झारखंड राज्यात जन्मलेले भारतीय आदिवासी स्वातंत्र्य सैनीक लोक नायक बीरसा मुंडा यांची जयंती १५ नोव्हेंबर रोजी उत्साहात संपन्न झाली .कार्यक्रमाचेअध्यक्षपदी सरपंच नितीन पाटील उपाध्ये तर प्रमुख उपस्थितीत खरेदी विक्री संघाचे संचालक विनोद पाटील उपाध्ये; उपसरपंच तैसीमभाई;. ग्रामपंचायायत अधीकारी सतीष वरघट ग्रा.पं सदस्य हर्षल पाटील उपाध्ये; आदिवासी वस्तीतील प्रमुख ज्ञानदेव तोडासे ;सतीष तोडासे; मंगल मसराम; संभाजी तोडासे; विकास सडमाके; तारा कोडापे; वाल्मीक कोडापे; रितीक कनके; राहूल सड़माके; शोएब; साजन डहाने; निसार मुल्लाजी इत्यादी ची उपस्थिती होती . प्रथम उपस्थित मान्यवरांनी आदिवासी नेते लोकनायक बिरसा मुंडा यांच्या प्रतीमेचे पुजन करुन हारार्पन केले व त्यांना अभिवादन केले . आदिवासी युवक



संभाजी तोडासे यांनी भारतीय आदिवासी स्वातंत्र्य सैनीक लोकनायक बीरसा मुंडा यांच्या कार्याबाबत अवगत केले . प्रास्तावीक ग्रामसचिव सतीष वरघट साहेब यांनी केले . कार्यक्रमाचे संचलन ग्रामपंचायत वसुली अधिकारी हरीदास चौधरी यांनी तर आभार प्रदर्शन ग्रामपंचायत संगणक परीचालक निकेत उपाध्ये यांनी केले . कार्यक्रम यशस्वी करण्यास ग्रामपंचायत कर्मचारी श्याम उपाध्ये ;सुधीर उपाध्ये यांचे सह आदिवासी युवा वर्गाने सहकार्य दिले .